# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 186/2022 दिनांक : 05.04.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 03.05.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **पद्मा बार जवळ वाजेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आरोपीस यासीनला का मारतोस त्यास मारू नको असे म्हणाला असता यातील आरोपीने यासीन यास ढकलुन देवुन फिर्यादीची कॉलर पकडुन क्यु रे तेरे को ज्यादा मस्ती आई है क्या, तु जानता नही क्या मै कौन हु, तु बिचमे क्यो आया असे म्हणुन आरोपीने त्याच्या कमरेचा चाकु काढुन फिर्यादीच्या पोटाच्या खालील भागास त्याचे हातातील चाकुने मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. व परिवारास जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शेख मिनाज शेख सिराज, वय 24 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. बिलाल नगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 267/2022 कलम 307, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री हंबर्डे, मो. नं. 9823040224** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 14.04.2022 रोजी 12.15 ते 14.00 वा. चे दरम्यान, **जि. प. कन्या शाळा गेट जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा युनिकॉर्न कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/बीएच–7358 किमती 40,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बालाजी सुभाष डेहाणे, वय 31 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. बरकतपुरा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 209/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 02.05.2022 रोजी चे 09.30 वा. चे सुमारास, **महोमद अलीरोड नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. एमएच–26/एजे–5941 किमती 40,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी आमेरखान पठाण जब्बारखान पठाण, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. अनिकेतनगर तरोडा नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 95/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2364 वाडीयार, मो.क्र. 9921470333** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**तामसा :–**दिनांक 16.04.2022 रोजी चे रात्री वेळ नक्की नाही, **दगडवाडी कॅम्प हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी त्यांच्या कंपनीचे नाली बांधकाम करण्याचे लोखंडी गजाळी दोन क्वींटल चाळीस किलो किंमती 17,280/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी तुकाराम विश्वनाथ भालेराव, वय 42 वर्षे, व्यवसाय लायजिंग ईचार्ज रा. दगडवाडी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 50/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1798 कंधारे**, **मो.क्र. 9823748525** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 02.04.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **लांडगे यांचे घरा जवळील रोडवर ते काब्दे हॉस्पीटलकडे जाणारे रोडवर जयभिमनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे आपले घरा समोर बसले असता नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन लांडगे याचे घरा जवळील रोडवर ते काब्दे हॉस्पीटलकडे जाणारे रोडवर मागील भांडणाचे कारणावरून फिर्यादीचे डोक्यात खंजरने मारून डोके फोडुन व लोखंडी फायटरने हनवटीवर छातीत तोंडावर मारून गंभीर जखमी केले. तसेच कानामागे बुक्याने व कडयाने मारून गंभीर दुःखापत केली व मुक्का मार दिला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी निहाल पि. विनायक पाईकराव, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. जयभिमनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 171/2022 कलम 326, 323 504, 506, 34 भादवि कायदा सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री गायकवाड मो. नं. 9370933727** हे करीत आहेत.

**2)कंधार :—**दिनांक 03.05.2022 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौ. फुलवळ ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून दारू पिवुन येवुन शिवीगाळ करून मारहाण करून तोंडातील खालचे दात पाडुन गंभीर दुःखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सखुबाई भ्र. छत्रपती देवकांबळे, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. फुलवळ ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 133/2022 कलम 325, 323 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/2425 राठोड, मो. नं. 9011736889** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :—**दिनांक 01.05.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **सम्राट आशोकनगर फिर्यादीचे घरा समोर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपी हे फिर्यादीचे घरा समोर आपसात भांडण करत होते. तेव्हां फिर्यादीचे आईने आमचे घरा समोर भांडण करूनका तुम्ही तुमच्या घराकडे जा असे म्हणाली असता तुला काय करायचे असे म्हणुन यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे आईला शिवीगाळ करून आरोपी क्रं 1 यांने फिर्यादीचे आईच डोक्यात फरशीने मारून डोके फोडुन गंभीर दुःखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी श्रावण गोविंदराव जोगदंड, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सम्राट अशोकनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 157/2022 कलम 326, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री भिसे, मो. नं. 9822987573** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**विमानतळ :—** दिनांक 02.07.2021 ते 00.00 ते दि.31.08.2021 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी स्वामी चिंचोली ता. दौंड जि. पुणे. ह. मु. दरवेशनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस ब्लास्टींग मशिन घेण्यासाठी माहेरुन 5,00,000/— रुपये घेवुन ये म्हणुन सांगुनही घेवुन येत नाहीस म्हणुन थापड बुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करुन उपासी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 169/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1792 लोखंडे, मो. क्र. 9527810006** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 04.05.2022 रोजी चे 15.25 वा. सुमारास, **वाजेगाव ते मुदखेड जाणारे रोडवर समदानी भाई हॉटेलवाले यांचे कॉम्पलेक्सच्या बाजुस टीनपत्रामध्ये मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4780/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री माणिक देवराव हंबर्डे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 265/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्र. 9284351496** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड